॥ कशी रे तुला भेटूं? ॥

गायिकाः मालती पांडे
गीतः राजा बढे
संगीतः श्रीनिवास खळे

कशी रे तुला भेटूं, मला वाटे लाज
लौकिक तुझा मोठा, आणिक घरंदाज ॥ धृ. ॥

करिती कुटाळकी तुझे ते टाळकरी
साथीला देई साथ घरची एकतारी
भोंवतीं निंदकांचे वाजती पखवाज ॥ १ ॥

ओळखतें राया माझी मी पायरी
बोलतील तुज तुझीं सोयरींधायरीं
जहरी बोलांचे हे जुळले तीरंदाज ॥ २ ॥

वाटलें कधीं काळीं तूं दिसशील डोळां
माझिया सौभाग्याचा पाहीन सोहोळा
घटका सुटकेची येईल का रे आज? ॥ ३ ॥

काजळ कलंकाचें नयनीं अंजनाला
अधरीं चुंबनाचा तांबूल चावायाला
देहाची वैजयंती घाला हो ब्रिजराज ॥ ४ ॥

होईल तेलवात स्नेहांत आपोआप
जळेल जन्मोजन्मीं प्रीतीचा नंदादीप
वयांत यौवनाचा विखुरला साज ॥ ५ ॥

घरंदाजः उच्चकुलीन
सोयरेधायरेः नातेवैक
तांबूलः विडा
वैजयंतीः जपमाळ, काळी तुळस, ध्वज
तेलवाटः तेलाने पणती स्वच्छ करणे
साजः दागिने